# चिमुकला सरदार

दास बागूल

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय काव्या
दा. क्र. c 93८



IRBK-0109138

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

एके दिवशीं चिमीला एक गंमत सुचली. ती धांवत धांवत गेली आणि महादूला म्हणाली, "महादू, ए महादू, मला एक गंमत सुचली आहे. एक दिवसभर मी तुझ्यासारखं वागायचं आणि तूं माझ्यासारखं! म्हणजे दिवसभर तूं नाचायचं, बागडायचं आणि मीं ठोकळ्यासारख्या सावकाश हालचाली करायच्या. बघ तरी कशी मजा येईल?"

"अग पण कां?" महादू तिच्याकडे वळून न बघतांच म्हणाला.

"उगीच आपली गंमत! आईबाबांना किती आश्चर्य वाटेल! गंगू मोलकरीण तर तोंडांत बोटच घालील!" चिमी म्हणाली.



IRBK-0109138

“ बरंय्. करूंया तसं.” असें म्हणून महादू हळूहळूं ताडलेले टमाटे टोपलींत भरूं लागला. मग भरलेली टोपली अगदीं सावकाश डोक्यावर घेत सरळ उभा राहिला व म्हणाला, “बरं! पण हें कधीं सुरू करायचं?”

चिमी आनंदानें टुणकन् उडी मारून म्हणाली, “अगदीं उद्यां सकाळीं उठल्याबरोबर. उठल्यापासून मी सुरुवात करीन. तूंहि ताबडतोब सुरुवात कर.”

“ ठीक आहे. कांहीं हरकत नाहीं. पण तो प्रकार मला आवडेल असं कांहीं वाटत नाहीं.” एकेक शब्द सावकाश म्हणत महादू टमाट्यांची टोपली स्वयंपाकघराकडे नेऊं लागला.

दुसऱ्या दिवशीं सकाळ झाली. पण चिमी नेहमींप्रमाणें तडकाफडकीं उठली नाहीं. प्रथम तिनें डोळे नुसते किलकिले करून आढ्याकडे पाहिलें. नंतर एक पाय पांघरुणाच्या बाहेर काढून उठून बसली; आणि मग त्या पायाकडेच पाहत राहिली!

“ चिमे, अग चिमे!” चिमीची आई तिच्या पांघरुणांची घडी घालण्याकरितां आंत येत म्हणाली, “ अग, तूं अजून पुरती अंथरुणाबाहेरहि पडली नाहींस वाटतं?”

चिमी एकेक शब्द सावकाश उच्चारीत म्हणाली, “ हो! मी... किनई....” एवढें म्हणून तिनें आपला दुसरा पाय पांघरुणाबाहेर काढला आणि त्याच्याकडे टक लावून पाहूं लागली.

चिमीचे वडील दिवाणखान्यांत बुटाचे बंद बांधीत होते. तेथूनच त्यांनीं मोठ्यानें विचारलें, “ चिमीला काय झालें बुवा! आज तिची उठण्याची गडबड अजून कशी ऐकूं येत नाहींत!”

चिमीची आई म्हणाली, “ मला तरी काय माहिती? आज ती फारच चमत्कारिक वागते आहे! तुम्ही तरी येऊन बघा.”

चिमीचे वडील चिमीच्या खोलींत पलंगाजवळ आले. त्यांनीं पाहिलें तेव्हां आपल्या पायांकडे टक लावून बसलेली चिमी त्यांना दिसली.



" चिमाबाई, चला, उठा बरं ! " वडील म्हणाले.

" बाळ चिमे, उठ बरं ! " आई म्हणाली.

" हंऽ हें बघ चिमा, चल, एक....दोन.... तीन. " चिमीचे वडील म्हणाले. पण इतक्यांत त्यांचें लक्ष खिडकीबाहेर गेलें आणि ' चार ' असें म्हणण्याऐवजीं ते आश्चर्यानें उद्गारले, " अरे बापरे ! " त्यांनीं खिडकींतून बाहेर पाहिलें तेव्हां त्यांना बागेमधला व्हरांड्याचा कठडा साफसूफ करणारा महादू दिसला. पण तो महादू नेहमींचा नव्हता. त्याच्याऐवजीं साफ करतां करतां फडकें हवेंत उडवून स्वतःभोंवतीं गिरकी मारणारा महादू पाहून चिमीचे वडील डोळे विस्फारून म्हणाले, " महादू, अरे महा , हा काय नवा प्रकार आहे ? "

" कुठं काय ? कांहीं नाहीं. मी आपला नुसता बागडतों आहे भुर्रर्ऽऽ र्ऽऽ र्ऽ " महादूनें झटक्यांत उत्तर दिलें.

चिमीचे वडील म्हणाले, " हें सगळेंच चमत्कारिक दिसतेंय् ! " असें म्हणून ते आणि चिमीची आई बागेंत लगबगीनें धावले. तेथें जाऊन

पोंचल्यावर महादू गुलाबाचें आळें साफसूफ करतांना दिसला. पण तें काम करतांनाहि त्याच्या उड्या चालूच होत्या !

चिमीच्या वडिलांनीं विचारलें, " अरे महादू, तूं काय काम करतो आहेस ?"

महादू एकदम ओरडून म्हणाला,

" आळं कुदळून घेतोंय्. हा ऽऽ हा ऽ हा हा ऽ "

"ठीक आहे……." असें हताशपणें म्हणून चिमीचे आई-वडील अचंबा करीत चहा प्यायला निघून गेले. चहाचे कप पुढें करीत चिमीची आजी म्हणाली, " आज चिमी कुठें दिसत नाहीं ती ? "

" अजून तिचं तोंड धुणं व्हायचं आहे ! तिला आज काय झालंय हें मला तरी बाई कांहीं समजत नाहीं. आम्हीं इकडे आलों तेव्हां ती नुसतीच हातावर हनुवटी टेकून बसली होती. " आई म्हणाली.

" मला वाटतें, ती आत्तां कुठें उठून उभी राहिली असेल. " वडील म्हणाले आणि ते दरवाज्याजवळ जाऊन चिमीला हांक मारीत म्हणाले, " चिमा, आटपलं का बाळ तुझं ?"

चिमी आपल्या खोलींतून म्हणाली, " नाहीं….बाबा….मी…. किनई….दंतमंजन….हातावर….घेतलं….आहे….आतां….मी ….बोटानं दांत….घासायला….सुरुवात….करीन…."

" छे छे ! तिला काय झालंय् तें मला तरी कळत नाहीं बुवा ! असं कधींच झालं नव्हतं. डॉक्टरला तर नाहीं ना बोलवावं लागणार ? " चिमीचे वडील म्हणाले.

" डॉक्टर ! " ओठाला लावलेली चहाची बशी पटकन् खालीं ठेवीत आई ओरडली.

इतक्यांत स्वयंपाकघराच्या खिडकींतून महादू दिसला. तो बंगल्याच्या मागच्या बागेकडे चालला होता. त्याच्या हातांत पाणी घालण्याची रबरी नळी होती. पण तो ती रबरी नळी दोरीसारखी फिरवीत दोरी-वरच्या उड्या मारीत चालला होता.

" महादू ऽ ऽ " असें ओरडत सर्वजण बागेंत धावले. पण

महादूनें त्यांच्याकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं. त्याच्या आपल्या दोरीवरच्या उड्या चालूच होत्या !

" छे ! छे ! हें भयंकरच दिसतंय्. " असें पुटपुटत चिमीचे वडील पुन्हां स्वयंपाकघराकडे वळले.

" मला तरी वाई कांहींच सुचत नाहीं, काय करावं तें ! " आई म्हणाली.

" हें बघ, मी सांगतों काय करायचं तें. मी ऑफिसांत गेल्यावर तूं मला टेलिफोनवरून पुढं काय काय होतं तें सांग. " वडील म्हणाले.

" ठीक आहे. तसंच करीन. " आई म्हणाली.

चिमीचे वडील ऑफिसांत जायला निघाले. जातां जातां त्यांनीं चिमीच्या खोलीकडे डोकावून पाहिलें. तेव्हां चिमी नुकतीच तोंड धुऊन खरखरीत टॉवेलनें गाल दाबून पुशीत होती. त्यामुळें तिचे गाल चांगलेच लालबुंद झाले होते.

" अग चिमे, माझी तर ऑफिसांत जायची तयारी झाली आणि तूं मात्र अजून.... " वडील म्हणाले.

" हो....अजून....मी...तोंड....धुऊन... " चिमी म्हणाली.

पण तें ऐकायला चिमीच्या वडिलांना मुळींच वेळ नव्हता. त्यांनीं चिमीला ' टाटा ' केला आणि मग ते घाईनें निघून गेले.

ऑफिसांत गेल्यावर तासाभरानें त्यांना फोन आला. चिमीची आई म्हणत होती, " चिमीनं आत्तां कुठं टॉवेल ठेवून खोलीच्या वाहेर पाऊल ठेवलं आहे. "

" म्हणजे, अजून चहा घेतलाच नाहीं वाटतं ?" वडिलांनीं विचारलें.

" नाहीं ना ! आणि महादूनं तर पालापाचोळा गोळा करून त्याच्यावरच नाचायला सुरुवात केली आहे. " आई म्हणाली.

"नाचतो आहे ?" वडिलांनीं विचारलें.

"होय ! चांगल्या स्वत:भोवतीं गिरक्या घेत नाचतो आहे."

"ऑं ! म्हणतेस तरी काय !" वडील म्हणाले.

मग आईनें टेलिफोन ठेवल्याचा कडरकट् असा आवाज आला. चिमीच्या वडिलांनीं टेबलावरील कामाच्या कागदांत पुन्हां डोकें खुपसलें. सह्या केल्या. आलेलीं पाकिटें भराभरा फोडून भर्रकन् वाचलीं. तेवढयांत पुन्हां टेलिफोनची घंटा वाजली. त्यांनीं टेलिफोन कानाला लावला. फोनमधून आई म्हणत होती,

"चिमी आतां पाट घेत आहे. ती आतां पाट घेऊन चहासाठीं बसेल."

"फक्त पाट घेण्यापर्यंतच तिची मजल आली?" वडिलांनीं विचारलें.

"हो ना! आणि महादू लंगडी घालीत फुलं तोडतो आहे." आई म्हणाली.

"लंगडी घालीत?" वडिलांनीं ओरडून विचारलें.

"सध्यां तरी एवढाच प्रकार दिसतोय्." असें म्हणून चिमच्या आईनें फोन बंद केला.

चिमीचे वडील पुन्हां कामाला लागले. त्यांच्या टेबलावर कामाचा ढिगारा पडला होता. पण तें करतांना त्यांना सारखी घरीं चाललेल्या प्रकारांची आठवण येत होती. अशा विचारांतच तिसरा प्रहर येऊन ठेपला. चिमीच्या आईचा पुन्हां फोन आला.

"हॅलो, हॅलो." वडील म्हणाले.

"हॅलो. चिमीनं आतां कुठं बशींत चहा ओतला आहे!" आईच्या बोलण्यांत दुःखाचा सूर उमटला.

"मला वाटतं, संध्याकाळीं फिरायला बाहेर पडेपर्यंत तरी तिचं चहा पिणं संपावं!" वडील म्हणाले.

"पण तुम्ही आजच्या दिवस लवकर घरीं कां येत नाहीं?" आईनें काकुळतीला येऊन विचारलें.

"हा बघ निघतोंच. तूं कांहीं काळजी करूं नकोस." असें म्हणून त्यांनीं फोन खालीं ठेवला. समोरचे कागद आवरून ठेवले आणि ते ऑफिसांत सूचना देऊन घराकडे निघाले.



ते जेव्हां घराच्या आवारांत आले, तेव्हां महादू बकुळीच्या झाडाच्या फांदीवर झोके घेत होता. परंतु चिमीच्या वडिलांना पाहतांच त्यानें खालीं उडी मारली आणि तो खालीं मान घालून उभा राहिला. चिमीच्या वडिलांनीं विचारलें, "काय रे महादू, काय होतंय् तुला ? सांग तरी मला."


"खरं सांगायचं म्हणजे मला ह्या वागण्याचा सकाळपासून कंटाळा आला आहे. केव्हां एकदांचा दिवस संपतो असं झालं आहे !" महादू म्हणाला.

"पण तुला सांगितलं कुणीं असं वागायला ?" चिमीच्या वडिलांनीं उत्सुकतेनें विचारलें.

" अहो, चिमाबाईंनीं गंमत करायला सांगितली म्हणून केली झालं ?" महादू नेहमींप्रमाणें सावकाश बोलला.

"अस्सं आहे होय ? आतां मला समजलं. अग लबाडे ! " असें म्हणत ते घरांत गेले. तितक्यांत छानदार पोषाख करून सजलेली चिमी आंतून धांवत आली आणि ' बाऽबा ' म्हणून ती वडिलांना येऊन बिलगली.

◆◆◆



# पिटुकला उंदीर

एके दिवशीं हवा मोठी छान पडली होती. वसंत ऋतूचेच दिवस होते ते ! उघडयावर खेळायला अशा वेळीं मजा वाटते. एक पिटुकला उंदीर तेंच करीत होता. धान्याच्या कोठींतून बाहेर पडून तो गवताच्या गंजीवर खुशाल एकटाच खेळत होता.

इतक्यांत त्यानें पावलांचा आवाज ऐकला. त्या शेताचा मालक बळीरामच तिकडे येत होता.

पिटुकल्या उंदरानें लपण्याकरितां धांवपळ केली. तो खूपच भेदरला होता. पण तरीहि बळीराम शेतकऱ्यानें त्याला पाहिलेंच.

बळीराम शेतकरी म्हणाला,

" भिऊं नको, भिऊं नको. तुझ्यासारख्या छकुल्या सांबराला मी कांहीं मारणार नाहीं ! " असें म्हणून तो पाठ फिरवून निघून गेला.

पिटुकला उंदीर अगदीं हालचाल न करतां उभा होता. शेतकरी काय म्हणाला, यावरच तो विचार करीत होता: " म्हणजे, मी काय छकुलं

सांबर आहें कीं काय? पण छकुलं सांबर म्हणजे काय? हें छकुलं सांबरच शोधून काढलं पाहिजे. म्हणजे मी नेमका कसा दिसतों, तें कळेल."

असें पुटपुटत तो मोकळ्या जागेंत येऊन उभा राहिला. इकडे पाहिलें, तिकडे पाहिलें. पलीकडे इतर जनावरें रवंथ करीत उभीं होतीं. पिटुकला उंदीर गायीकडे गेला. गाय आपली भसाभसा गवत खात होती.



पिटुकला उंदीर मोठ्यानें ओरडून म्हणाला,

" ऐकलं का, तूं कोण आहेस? सांबर आहेस का?"

" छे! मुळींच नाहीं! मी गाय आहें." गाय म्हणाली.

पिटुकला उंदीर म्हणाला,

" अस्सं होय. मी आहें सांबर. आणि मला दुसऱ्या सांबराला पाहायचं आहे."

" तूं आणि सांबर?" गायीला इतकें आश्चर्य वाटलें कीं, तिच्या तोंडांतला घांस तोंडांतच राहिला!

" अग, मी छकुलं सांबर आहें." पिटुकला उंदीर म्हणाला.

गाय गोंधळून म्हणाली,

" अगबाई, हें कुणीं सांगितलं तुला?"

उंदीर छाती फुगवून म्हणाला, " खुद्द बळीराम शेतकऱ्यानंच मला सांगितलं हें!"

ह्यावर काय बोलावें हेंच गायीला सुचेना. कारण, बळीराम शेतकरी कधींच खोटें बोलत नसे. गवताचे एक-दोन घांस तोंडांत कोंबीत गाय म्हणाली,

" तूं हें घोडयाला कां विचारीत नाहींस? तो माझ्यापेक्षां जास्त फिरतो. सांबर कुठं असतं, हें त्याला कदाचित् माहीत असेल."

पिटुकला उंदीर घोडयाकडे गेला. ह्यावेळीं त्याला मघापेक्षां मोठ्यानें बोलावें लागलें. कारण, गायीपेक्षां घोडयाची मान उंच होती. मोठ्यानें ओरडत उंदरानें म्हटलें,

" ऐकलं का? मला सांबर पाहायचं आहे."

घोडा म्हणाला, " आपल्या ह्या शेतीवाडीवर कांहीं सांबर दिसणार नाहीं. त्याच्याकरितां रानांतच जायला हवं."


" जाईन मी रानांत. कारण, मी स्वतः छकुलं सांबर आहे ना!"

" तूं आणि सांबर? कुणा लेकानं तुला सांगितलं?" घोड्यानें खिंकाळून विचारलें.


" खुद्द बळीराम शेतकऱ्यानंच मला सांगितलं कीं!" पिटुकला उंदीर छाती पुढें काढून म्हणाला. ह्यावर काय बोलावें, हेंच घोड्याला

सुचलें नाहीं. बळीराम शेतकरी कधींच खोटें बोलत नसे. शेवटीं घोडा म्हणाला, “ हें बघ, तूं रानांत जाऊन पाहायला कांहीं हरकत नाहीं.”

पिटुकला उंदीर तुरुतुरु चालूं लागला. शेवटीं एकदांचा तो रानांत येऊन पोंचला. पण तेथें तर एकहि प्राणी दिसत नव्हता. नुसतीं झाडेंच



झाडें ! थोडीशीं रानटीं फुलें आणि पलीकडे खळखळून वाहणारा ओढा. त्या ओढ्यांतलें पाणी सूर्यप्रकाशांत चमचम करीत होतें. तें पाहून त्याला लागली तहान. थंडगार पाणी पिऊन ताजेंतवानें व्हावें असें त्याला वाटलें. म्हणून तो ओढयाच्या कांठाशीं जाऊन पोटभर पाणी प्याला.



इतक्यांत तेथें एक मोठा प्राणी आला आणि सुळुक सुळुक पाणी पिऊं लागला.

उंदीर धीर करून मोठ्यानें म्हणाला, "अहो, अहो! तुम्ही मला एक सांगतां का? छकुलं सांबर कुठं भेटेल हो?"

त्या प्राण्यानें त्याच्याकडे पाहून म्हटलें,

"मीच तें सांबर आहें."

"अहो, काय म्हणताय काय? तुम्ही सांबर तर मी छकुलं सांबर!"

"कुणीं सांगितलं तुला हें?"

सांबरानें आश्चर्यचकित होऊन विचारलें.

पिटुकला उंदीर म्हणाला,

"खुद्द बळीराम शेतकऱ्यानंच सांगितलं कीं!"

"मला वाटतं बळीराम शेतकऱ्याचा कांहींतरी घोटाळा झालेला दिसतो. हें बघ, इकडे ये. ह्या ओढ्यांत माझ्यावरोबर बघ बरं. दिसतोस का तूं माझ्यासारखा?"

"हो तर, नक्कीच दिसणार. मी जरी कितीहि छोटा असलों, तरीहि मी तुमच्यासारखाच एक छकुला आहें."

असें म्हणत म्हणत उंदरानें सांबरावरोबर ओढ्याच्या नितळ पाण्यांत डोकावून पाहिलें:

पाण्यांतील सांबराच्या डोक्यावर खूप मोठालीं शिंगें होतीं. पिटुकल्या उंदरानें आपलें डोकें चांचपून पाहिलें. तेथें शिंगांचा मागमूसहि नव्हता. सांबराचा चेहरा मोठा आणि पसरट होता. उंदराचा चेहरा निमूळता आणि चिमुकला होता. सांबराचें शेंपूट आंखूड होतें, पण त्याला लोंकरीचा गुंडा होता. उंदराची शेपटी दोरीसारखी बारीक आणि लांब होती.

"मला वाटतं, बळीराम शेतकरीच चुकलेला दिसतो. मी कांहीं सांबर नाहीं, अगदीं छकुलं सांबरसुद्धां नाहीं!" असें म्हणतांना उंदराच्या डोळ्यांतून अश्रु ठिबकले.

सांबरानें 'उगी, उगी' म्हणून त्याची समजूत घातली. "तूं असं कर ना, ह्या रानांतच एक म्हातारं घुबड राहतं. तें खूपच शहाणं आहे. तें तुला चांगलं समजावून देईल."

" मी छकुलंदेखील सांबर नाहीं याचं मला खूप वाईट वाटतं. तुम्ही खूपच सुंदर आहांत ! " असें म्हणून पिटुकला उंदीर घुबडाच्या शोधाला निघाला. एका झाडाच्या ढोलींत तें म्हातारें घुबड पेंगत बसलें होतें. उंदरानें खालून ' चुक् चुक् ' केलें.

घुबडानें विचारलें,

" काय रे पिटक्या, कसं काय आहे ? कांहीं मदत पाहिजे काय ?"

" हो ना. मला थोडा सल्ला हवा आहे. काय हो, मी छकुलं सांबर आहे का ? " उंदरानें विचारलें,

" छे, कुणीं सांगितलं तुला हें ? "

" खुद्द बळीराम शेतकऱ्यानंच सांगितलं कीं ! "

" अरे बाबा, तुझाच थोडासा घोटाळा झाला आहे. बळीराम आहे हिमालयाकडच्या प्रदेशाकडून आलेला शेतकरी. तेथील शेतकरी बोलतांना निराळं बोलतात. तो जेव्हां तुला छकुलं सांबर म्हणाला, तेव्हां त्याला उंदीरच म्हणायचं होतं, समजलं ? "


" अस्संऽ होऽय ! पण आतां मला माझ्यासारखाच छकुला उंदीर मिळाला तर फार बरं होईल. मला एकटं राहण्याचा अगदीं कंटाळा आलांयं. "

" हो हो ! तेवढं माझ्याकडे लागलं " असें म्हणून घुबडानें एक घूत्कार केला. त्याबरोबर झाडाच्या मागून एक छोटा उंदीर आला.

मग ते दोघे उड्या मारीत शेताकडे निघाले.



अनुक्रम ३७०४३
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ३५३८
नों. दि.
नालय



# खार आणि सांवली

सकाळ होतांच चिमुकल्या खारीला जाग आली.

सूर्य नुकताच उगवला होता.

खारीनें आपल्या झुबकेदार शेपटीनें तोंड साफसूफ केलें. मग तिनें पुढचे पाय ताणले, मागचे पाय ताणले आणि आजूबाजूला पाहून एक भली मोठी जांभई दिली.

मग तिचें लक्ष सूर्याच्या पिंवळ्या गोळ्याकडे गेलें.

" वा ! सकाळ किती सुंदर पडली आहे ! अशा वेळीं प्रभात-फेरी काढायलाच हवी. " खार स्वत:शींच पुटपुटली.

ती नाचत-बागडत रानांत निघाली.

तिच्यापुढें तिची लांबलचक सांवली पुढें पुढें सरकूं लागली. त्या सांवलीकडे पाहून खार चालतां चालतां म्हणाली, " अरे बापरे, माझे पाय किती लांब आहेत ! आणि शेपटीसुद्धां केवढी झुबकेदार आहे ! कान तर फारच सुरेख दिसताहेत. नक्कीच, या जंगलांतलि कोणत्याहि प्राण्यांपेक्षां मी मोठीच असणार. वा ! केवढी मजा ! "

ती मध्येंच थबकली आणि आपल्या सांवलीकडे कौतुकानें पाहूं लागली.

" मी कोल्ह्यापेक्षां मोठी आहें.. लांडग्याहून मोठी आहें, किंबहुना अस्वलापेक्षां देखील मोठी आहें. "

हें ती एवढया मोठयानें म्हणाली कीं, शेजारच्या जाळींत झोंपलेला कोल्हा दचकून जागा झाला. खारीचें हें बढाईखोर बोलणें ऐकून तो गुरगुरला, " कोल्ह्यापेक्षां मोठी आहेस काय ? " आणि असें म्हणून त्यानें एकदम खारीच्या पुढ्यांत उडी मारली.

खारीनें एकवार त्याच्याकडे निरखून पाहिलें आणि मग झाडाच्या शेंडयाकडे धूम ठोकली.

" हुश्श ! हा कोल्हा खरंच मोठा आहे. आजपर्यंत मीं पाहिलेल्या सर्व कोल्ह्यांच्यापेक्षां तो नक्कीच जास्त मोठा आहे. " असें म्हणत ती झाडावरच बसून राहिली.

कोल्हा निघून गेल्यावर ती थबकत थबकत खालीं उतरली आणि नाचत-बागडत रानांत निघाली.

तिला पुन्हां आपल्यापुढें चालणारी लांबलचक सांवली दिसली.

" तो कोल्हा मोठा होता हें खरं. पण म्हणून काय झालं ? मी देखील मोठी आहे. कोल्ह्यापेक्षां मोठी आहे. लांडग्याहून मोठी आहे.



एवढंच नव्हें तर अस्वलाहून देखील मी मोठी आहे ! " असें ती पुन्हां म्हणूं लागली.

बाजूला वडाच्या खोडाआड एक मोठा लांडगा अजून झोपेच्या गुंगींतच होता. पण खारीच्या या बडबडण्यामुळें तो दचकून जागा झाला.

' लांडग्यापेक्षां मोठी आहेस काय ? ' असें म्हणत तो तिच्यापुढें जाऊन उभा राहिला.

खारीनें एकवार त्याच्याकडे निरखून पाहिलें आणि तिनें झाडाच्या शेंडयाकडे धूम ठोकली.

ती खूप वेळ झाडावरच बसून राहिली, शेवटीं लांडगा कंटाळून निघून गेला.

" हुश्श ! हा लांडगा खरंच मोठा आहे. आजवर त्याच्याइतका मोठा लांडगा मी पाहिलाच नव्हता ! " खारीनें निःश्वास सोडून म्हटलें.

ती झाडाखालीं उतरली.

रानांत जाणाऱ्या रस्त्यानें ती नाचत-बागडत जाऊं लागली.

तिला पुन्हां आपल्यां पुढें पुढें जाणारी लांब सांवली दिसली.

" तो लांडगा खूप मोठा होता. पण म्हणून काय झालं ! मीं अधिक मोठी आहें. कोल्ह्यापेक्षां मोठी आहें. लांडग्याहून मोठी आहें. एवढंच नव्हें तर अस्वलापेक्षांहि मी मोठी आहें. " ती पुटपुटली.

एक काळें केंसाळ आणि गुबगुबीत अस्वल शेजारींच एका गुहेंत घोरत पडलें होतें. पण त्यालाहि खारीचें हें बडबडणें ऐकूं गेलेंच ! तें खडबडून उठत म्हणालें, " कोण लेकाचा म्हणतोय कीं मी अस्वलापेक्षां मोठा म्हणून ? " आणि तें बाहेर येऊन उभें राहिलें.



चिमुकल्या खारीनें त्याच्याकडे एकवार निरखून पाहिलें आणि मग झाडाच्या शेंडयाकडे धूम ठोकली.

" अरे बापरे ! हें बेटं भारीच मोठं अस्वल दिसतंय. आजवर कांहीं आपण ह्याच्याइतकं मोठं अस्वल पाहिलं नव्हतं. " अस्वल निघून जाईपर्यंत खार झाडावरच बसून राहिली.

पण खार आतां चांगलीच दमली होती. इतकी दमली होती कीं, तिला खूप गाढ झोप लागली.

बराच वेळ ती झोपेंत होती. मग तिला अचानक जाग आली. तिनें डोळे किलकिले करून आभाळाकडे पाहिलें.

सूर्य डोक्यावर येऊन तळपत होता.

खालीं पाहिलें तर तेथें अस्वलाचा पत्ता नव्हता.

मग खार दौडतच खालीं आली.

खालीं आल्यावर ती आपली लांबच लांब असलेली सांवली शोधूं लागली.

पण लांब सांवलीचा कुठें पत्ता होता ? त्या लांब सांवलीऐवजीं अतिशय छोटी सांवली खारीच्या पुढयांत घुटमळत होती.

" म्हणजे ? मी जवळ जवळ नाहींशीच झालें कीं ! आतां तर मी उंदरापेक्षांहि लहान झालें ! " खार गोंधळून म्हणाली आणि ती मुळुंमुळुं रडूं लागली.

तेवढयांत एक तिरसट घुबड तिच्या अंगावर कर्कशपणें ओरडलें, " ए, बंद कर तुझं रडणं. मला झोंप येतेय्. " पण चिमुकल्या खारीला अधिकच रडें कोसळलें. घुबडाला खारीची कींव आली.

" उगी, उगी. काय झालं तुला रडायला ? "

" अंऽहंऽऽ, म्हणजे त्याचं असं झालं कीं, मी सकाळीं या रानांतल्या सगळ्या प्राण्यांपेक्षां मोठी होतें. मी कोल्ह्यापेक्षां मोठी होतें, लांडग्याहून मोठी होतें. झालंच तर अस्वलापेक्षांहि नक्कीच मोठी होतें; पण आतां बघ ना ? मी कित्ती छोटी झालेंय ! उंदरापेक्षांहि लहान झालेंय."



" वेडपटच दिसतेस. तूं कोल्हा, लांडगा किंवा अस्वल यांच्या-पक्षां मोठी नव्हतीच, आणि आतांहि तूं उंदरापेक्षां लहान नाहींस. तूं खारीइतकीच मोठी आहेस. समजलं! मोठी नाहींस आणि लहान पण नाहींस. पळ, जा. आतां मला झोंपूं दे."

पण खार पुन्हां रडूं लागली आणि हुंदके देत देत म्हणाली, "मी कांहीं वेड्यासारखं बोलत नाहीं. मी सकाळीं खूप मोठी होतें हें मला नक्की ठाऊक आहे. आणि आतां मी लहान झालेंय हेंहि मला समजतं आहे."

" म्हणे तुला माहीत आहे ! तुला कसं ग माहीत झालं ? " घुबडानें खारीला खडसावलें.

" म्हणजे कमालच झाली ! अहो, मीं माझी सांवली पाहिली ना ! सकाळीं ती लांबच लांब होती आणि आतां तर ती पार लहान झालीय्." खार डोळे पुशीत म्हणाली.

" हात्तिच्या ! असं म्हणतेस होय तूं ! " घुबड खुदूकन हंसून म्हणालें, " सकाळीं सांवल्या नेहमींच लांब असतात हें तुला माहीत नाहीं ? दुपारीं त्या अगदीं आंखूड असतात हें तुला माहीत नाहीं ! सकाळीं तुझी सांवली मोठी होती, आतां ती छोटी आहे. पण तूं मात्र खारीएवढीच आहेस. मोठीहि नाहींस आणि छोटीहि नाहींस. कळलं ? "

" खरंच का तसं असतं ? माझा तर बाई विश्वासच बसत नाहीं ? " खार चकित होऊन म्हणाली.

" संध्याकाळीं तूं जाऊन पहा. तुझी सांवली पुन्हां लांब झालेली तुला दिसेल." घुबड म्हणालें.

खार मग सूर्य खालीं जाण्याची वाट पाहत बसली. सूर्य डोक्यावरून बराच खालीं उतरल्यावर ती पुन्हां झाडावरून खालीं आली. आणि काय आश्चर्य ! पुन्हां तिची सांवली लांबच लांब पडली होती.

खार खदखदून हंसली आणि म्हणाली, "माझी सांवली अस्वलाइतकी मोठी होते किंवा उंदराएवढी छोटी होते. पण मी मात्र खारीएवढीच राहतें ! " असें म्हणून ती नाचूं लागली. तिच्याबरोबर तिची सांवलीहि नाचली.

# बोलकें मांजर

गांवाबाहेरच्या एका घरांत पुतळा नांवाची म्हातारी राहत होती. ती एकटी राहत होती तेंच बरें होतें! कारण, दुसऱ्याला पोसण्याइतका तिच्याजवळ पैसा नव्हता. जो कांहीं थोडा पैसा होता तो ती अगदीं हात राखून खर्च करी. नाहीं म्हणायला तिच्याजवळ एक मांजर मात्र होतें.

त्या मांजराचा म्हातारीला कांहींच त्रास होत नव्हता. आपल्या जेवणांतून उरलेली दूधभाकर ती त्या मांजराला घाली. तेवढयावर मांजर आपली भूक भागवून म्हातारीच्या मागें मागें हिंडत असे. म्हातारीलाहि त्या मांजराचा ळळा लागला होता.

कधीं कधीं म्हातारीला वाटायचें कीं, हें मांजर बोलकें असतें तर किती चांगलें झालें असतें? कुणाशींहि न बोलतां दिवसभर काम करायचा तिला कंटाळा यायचा. पण काय करणार? मांजराला थोडेंच बोलतां येणार होतें?

एके दिवशीं संध्याकाळ झाली, तरी म्हातारी आपल्या हातमागावर विणायचें काम करीतच होती, सटक् फटक् सटक् फटक्. धोटा सारखा इकडून तिकडे आणि तिकडून इकडे धांवत होता.

इतक्यांत दारावर थाप पडली! पण हातमागावरील धोट्याच्या खडखडाटांत ती थाप म्हातारीला कांहीं ऐकूं आली नाहीं. दारावरच्या माणसानें मग जोरजोरानें कडी वाजवली. तेव्हां कुठें म्हातारीच्या लक्षांत आलें कीं, कुणीतरी दार ठोठावतें आहे. तिनें काम थांबविलें आणि स्वत:शीं ती पुटपुटली, " कोण आलं मेलं तडफडायला आतां इथं? "

तिनें दिवा घेतला, दाराजवळ जाऊन तिनें अडसर काढला आणि दार किलकिलें केलें. त्या अर्धवट उघडलेल्या दारांतून दिव्याचा प्रकाश बाहेरच्या माणसावर पडला. त्या तेवढ्या उजेडांत देखील म्हातारीनें त्या माणसाला निरखून पाहिलें. त्याच्या पेहरावारून तो नक्कीच लांकूडतोडया दिसत



होता. त्यानें कमरेला लाल उपरणें आवळून बांधलें होतें. डोक्यावरच्या पागोट्यांत कावळ्याचें पीस होतें आणि विशेष म्हणजे त्याच्या मिशा केवढाल्या होत्या ! मिशा कसल्या खराटाच म्हणायला हवा !

" माझं नांव काळूराम." त्या लाकूडतोड्यानें झोकांत नमस्कार करून सांगितलें.



म्हातारीनें त्याच्या नमस्काराकडें दुर्लक्ष करीत तुसडेपणानें विचारलें, "कशाकरितां तूं दार ठोठावलंस? तुला काय पाहिजे तें लवकर सांग. सारी रात्र उभी राहायला मी रिकामटेकडी नाहीं."

काळूराम म्हणाला, "मला निवारा आणि झेपेलसं काम पाहिजे. दूरदूरचे पल्ले आतां मला सोसत नाहींत. मी आतां खूपच म्हातारा झालों आहें. मी इथंच काम करून तुम्हांला मदत करीन."

"मला कुणाची मदत नको. माझी मी धडधाकट आहें. आणि सोबतीला मांजरहि आहे." असें फणकाऱ्यानें म्हणून म्हातारी दार बंद करण्याच्या बेतांत होती. पण तेवढ्यांत काळूराम चपळाईनें घरांत घुसला. त्याला म्हातारीच्या पायाशी घोटाळणारें मांजर दिसलें. त्यानें क्षणभर त्याच्याकडे टक लावून पाहिलें आणि म्हातारीकडे वळून म्हटलें,

"अरे वा! हें मांजर तर फारच चांगलं दिसतं आहे. मला घरांत घ्यावं कीं घेऊं नये, याचं उत्तर या मांजराला कां विचारीत नाहींस? माझ्या कामाबद्दल मला दुसरंतिसरं काहीं देऊं नका. फक्त झोपायला जागा आणि पोटाला थोडीशी भाकरी."

म्हातारीनें आतां मात्र डोळे वटारले, "काय चावटपणा लावला आहेस? मांजर बोलत नसतं, समजलं? आतां फार वेळ—"

पण काय आश्चर्य? मांजरानें बोलायला सुरुवात केली होती. मांजर म्हणत होतें,

"ऐका! अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगीं मीसुद्धां बोलूं शकतें. हा काळूराम मला माणूस दिसतो. कामहि चांगलं करील. त्याला घरांत घ्यायला हरकत नाहीं."

म्हातारी तर चक्क दोन मिनिटें 'आ' करून मांजराकडे पाहतच राहिली! शेवटीं भानावर येऊन ती म्हणाली, "बरं तर, ये आंत. मांजर बोलूं लागलं तेव्हां त्याचं ऐकलं पाहिजे."

21 NOV 1971

१८.९.६४
बा.शा.
३९३

# चिमुकला सरदार

अनुक्रम ३७७६४
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ३९३
नों. दि. १८।९।६४

अनुवादक : देवीदास बागूल

चित्रकार : वसंत सरवटे

चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, टिळक-रस्ता पुणे २.

प्रथमावृत्ति १९६१

मुद्रक
प्र. भा. काळे,
प्रतिभा मुद्रणालय,
सदाशिव पेठ, टिळक-रस्ता, पुणें २.

प्रकाशक
दे. श्री. जोशी आणि म. द. लोखंडे
चिरंजीव ग्रंथ-प्रकाशन,
सदाशिव पेठ, टिळक-रस्ता, पुणें २.

किंमत दीड रुपया

चिमुकला सरदार

अनुक्रम


१ अदलाबदल

२ पिदुकला उंदिर

३ खार आणि सांवली

४ बोलके मांजर

५ चिमुकला सरदार

# अदलाबदल

जेव्हां पाहावें तेव्हां महादू चिमीच्या बागेंत शांतपणें काम करीत असायचा. चिमीची बाग म्हणजे चिमीच्या वडिलांची बाग ! बाग खूप ऐसपैस होती. पुढच्या बाजूला निशिगंध, अबोली, मोगरा, जाईजुई इत्यादि फुलझाडें होतीं. परसाच्या बाजूला टमाटे, रताळीं यांचीं रोपें होतीं. काम करतांना महादूच्या फक्त हातांचीच हालचाल व्हायची. बाकी सगळें शरीर ठोकळ्या-सारखें ! कुदळीनें खणतांना किंवा वाटाण्याच्या शेंगा तोडतांना तो ओणवा उभा राहिला म्हणजे कमानीसारखा दिसायचा. कुदळ वरखालीं करण्याकरितां फक्त हात तेवढे हालत असत. पळतांना त्याच्या-कडे पाहिलें तरी वाटायचें कीं, महादू कोणत्याहि क्षणीं पुतळ्यासारखा उभा राहील. महादूचा हा एकच खाक्या !



अनुक्रम ३५०४५
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ३९३८
नों. दि. १७५५६७

चिमीचें सगळेंच उलटें होतें. लंगडी घालत चालावें; दोरीवरच्या उड्या घेत फिरावें; लांब किंवा उंच उड्या माराव्यात; सापासारखें वळवळत इकडे तिकडे करावें; किंवा हातपाय जवळ जवळ टेकून बेडकीसारख्या उड्या मारीत खुडबुडावें. याशिवाय चिमीला दुसरें कांहीं सुचत नसे. सरळ चालणें नांवाचा प्रकार चिमीच्या गांवींच नव्हता.




कधीं कधीं चिमी महादूला आश्चर्यानें विचारायची, “ महादू, अरे तुला ठोकळ्यासारखं उभं राहायला कसं रे आवडतं ? ”

“ म्हणजे ? मला तसं उभं राहतां येतं म्हणून आवडतं ! पण मी असं विचारतों कीं, तुला एवढं नाचायला-बागडायला कां आवडतं ? ” महादू सावकाश उत्तर देत विचारायचा.

चिमी भरकन् म्हणायची, “ अय्या ! मला उडया मारतां येतात म्हणून मी नाचतें-बागडतें ! ”



मग काळूराम आंत आला. त्यानें इकडेतिकडे नजर फिरविली. चुलीवरच्या पातेल्यांत कांहींतरी शिजतें आहे हें त्यानें ओळखलें. तेव्हां मांजर पुन्हां म्हणालें, " काळूरामला भूक लागलेली दिसते. पुतळा मावशी, त्याला वाडगाभर खीर दे ना. "

म्हातारीनें उसासा सोडून म्हटलें, " अशी जर सुरुवात केली, तर मला वाटतें, आठवडयाच्या आंतच खिरीच्या शिध्याचा चट्टामट्टा होईल. पण आतां तूं म्हणतेच आहेस तर देतें थोडीशी खीर त्याला. "

काळूरामनें पुढयांत ठेवलेल्या खिरीचा एखाद्या अधाश्याप्रमाणें फडशा उडवला. नंतर म्हातारीनें दाखविलेल्या कोपऱ्यांत त्यानें झोपण्यासाठीं अंग पसरलें. म्हातारीनेंहि मांजराला जवळ घेऊन कुरवाळलें आणि म्हटलें, " इतक्या वर्षांनंतर तुला बोलतां यायला लागलं हें मोठं अजबच म्हणायचं. कशामुळं तुला बोलतां येऊं लागलं ? " पण ह्यावर मांजरानें कांहीं उत्तर दिलें नाहीं. आपल्या झुपकेदार शेपटीनें त्यानें आपल्या मिशा तेवढया साफ केल्या आणि मग तें चक्क झोपी गेलें.

म्हातारीनें मनांतल्या मनांत ठरविलें कीं, मांजरानें दिलेला सल्ला चांगलाच असला पाहिजे आणि झालेंहि तसेंच. काळूराम आतां परसांतल्या भाजीपाल्याची देखरेख करी. घुशींचा त्रास कमी कसा होईल याची काळजी घेई आणि मिळेल तेवढ्या अन्नावरच लांबलचक ढेकर देई. काळूराम खूष आणि म्हातारीहि खूष !

पण मांजर मात्र काळूराम आल्यापासून बावरलें होतें.

एके दिवशीं मांजरानें म्हातारीला म्हटलें, "तूं काळूरामाला एवढंसंच काय जेवायला घालतेस? एवढं मोठं काम केल्यावर त्याला भाकरी-बरोबर थोडं लोणी द्यायला नको का?"

म्हातारीनें थोडीशी चुळबुळ केली. काळूराम मात्र थंडपणें चटणी-भाकर मटकावत होता.

म्हातारी मांजराला म्हणाली, "पण लोण्याला पैसे पडतात."

"हात्तिच्या! तेवढा खर्च केला तर त्या लोण्यामुळें काळूराम दुप्पट काम करील." मांजर म्हणालें.

मग काळूराम बाहेर गेला असें पाहून मडक्यांच्या उतरंडीमधून एक मडकें म्हातारीनें काढलें. त्यांतून जुनापुराणा बटवा काढला. इतक्यांत दार वाजलें. म्हणून तिनें चमकून मागें पाहिलें. काळूराम दारांत उभा राहून म्हातारीच्या हालचाली निरखून पाहत होता. म्हातारीनें वळून पाहिल्या-बरोबर तो म्हणाला, "मी फावडें घ्यायला विसरलों होतों. आतां मी बागेचा बांध चांगला करणार आहें."

म्हातारीनें बटवा झटकन् लपविला.

काळूराम बाहेर कोपऱ्यांतील फावडें उचलीत होता. इतक्यांत मांजर पुन्हा म्हणालें, "काळूरामाचं बांध दुरुस्त करण्याचं काम संपलं म्हणजे त्याला बाजारांत पाठव. तो बाजारांतून चांगलंसं लोणी आणि इतर पदार्थ घेऊन येईल."

आतां मात्र म्हातारी खवळली. ती म्हणाली, "काटकसर कशी करावी तें मला चांगलं समजतं. आणि माझ्याइतकी उत्तम खरेदी तर कुणीच करणार नाहीं. तेव्हां मीच बाजारांत जाईन."



ह्यावर मांजर पुन्हां म्हणालें, "काळूराम खरंच चांगला बाजार करतो. ह्या सगळ्या पंचक्रोशींत खरेदीच्या कामांत त्याचा हात कुणीच धरूं शकणार नाहीं. म्हणून सांगतें, त्यालाच पाठव."

आणि खरेंच, मांजरानें सांगितल्याप्रमाणें काळूराम हा बाजार करण्यांत देखील वाकबगार निघाला. त्यानें चांगलें लोणी, कांहीं फराळाचे पदार्थ, तिखट-मीठ आणि स्वत:साठीं थोडी तंबाखूहि आणली.

तें सगळें सामान पाहून म्हातारी चांगलीच हादरली.

" सगळे पैसे उडवलेले दिसतात ! " म्हातारीनें नापसंती दर्शवीत म्हटलें.

काळूरामनें उत्तर द्यायच्या ऐवजीं मांजरच म्हणालें, " नाहींतरी पैसे सांभाळून काय करायचं ? भूक लागली तर पैसे खातां येतील का ? त्यांचा धूर ओढतां येईल काय ? "

" नाहीं ! "

" पैसे पांघरून ऊब आणतां येईल का ? "

" नाहीं ! "

" पैसे जाळून स्वयंपाक करतां येईल का ? "

" नाहीं ! "

मांजरनें डोळे मिचकावीत म्हटलें, " मग पैसे हवेत कशाला ? जितक्या लवकर ते खर्च करतां येतील तितकं चांगलं. "

आतां कुठें म्हातारीच्या चेहऱ्यावर उमज पडल्याचें दिसलें. ती म्हणाली, " मला असा विचार कधींच सुचला नाहीं. खरंच, तुझंच बरोबर आहे. काळूराम, तूं आणलेलं सामानहि चांगलं आहे ! "

पण काळूराम जेव्हां बाहेर गेला तेव्हां म्हातारीनें बटव्यांतील नाणीं पुन्हा एकदां मोजून पाहिलीं. आणि मग ती मांजराला म्हणाली, " आतां फारच थोडीं नाणीं उरलीं आहेत. तेव्हां पैसे चांगले नाहींत, हें तूं मला पुन्हां समजावून सांग. "

पण ह्यावर मांजर कांहींच बोललें नाहीं !

एके दिवशीं काळूराम लाकडें तोडायला जंगलांत गेला होता. पुतळा म्हातारी अंगणांतच कांहींतरी करीत होती. इतक्यांत एक घोडेस्वार दाडत आला आणि म्हातारीच्या घरासमोर थांबला. घोडयावरून अदबीनें उतरून तो म्हातारीजवळ आला. त्यानें म्हातारीला विचारलें, " म्हातार-आजी, काळूराम नांवाचा कोणी माणूस इथं काम करतो का ? "

" हो हो ! फारच चांगलं काम करतो तो. "

पण घोडेस्वाराचें तेवढयानें समाधान झालें नाहीं. त्यानें पुन्हां म्हटलें, " ह्या प्रांतांत तर काळूराम खूपच आहेत. काळूराम

हें नांव पुष्कळजण वापरतात. तुमचा माणूस कमरेला तांबडं उपरणं बांधतो काय ? "

" बांधतो खरा. " म्हातारीनें मान हालवीत उत्तर दिलें.

पुष्कळ काळूराम तसें उपरणें बांधीत असतील, असें वाटून त्यानें विचारलें, " त्याच्या मिशा खराट्यासारख्या आहेत काय ? "

" हो, आहेत. "

पण अशा खराट्यासारख्या मिशा असणारेहि पुष्कळ निघतील असें वाटून तो म्हणाला, " मी असं विचारतों कीं, तुमचा हा काळूराम आपला आवाज बदलून दुसऱ्या एखाद्या वस्तूंतून आवाज काढतो काय ? "

" दुसऱ्या एखाद्या वस्तूंतून आवाज काढतो ? म्हणजे ही काय जादू आहे ? "

" म्हणजे तुम्हांला ही चलाखी माहीत नाहीं वाटतं ? बरोबरच आहे. अशी चलाखी फारच थोड्यांना साधते. किंबहुना, ती फक्त काळूरामालाच साधते ! हा काळूराम आपला आवाज झाडांतून काढतो, छपरांतून काढतो, कशांतूनहि काढूं शकतो ! "

" छे, शक्यच नाहीं ! " म्हातारी भतीनें ओरडली : " माझ्या घरीं असं करणारं कुणीहि नाहीं. असा माणूस जादूटोणावाल्या-कडेच शोभेल. "

" त्याचं कांहीं सांगतां येत नाहीं. पण तें असो. मला त्याची सध्यां गरज आहे हें खरं. शिकार करतांना मला त्याचा चांगला उपयोग होईल. "

इतक्यांत बैलगाडीचा आवाज ऐकूं आला. म्हातारी आणि घोडेस्वार यांनीं वळून पाहिलें. तेव्हां त्यांना काळूराम लाकडांनीं भरलेली गाडी हांकीत येत असलेला दिसला. जवळ आल्यावर घोडेस्वार व काळूराम ह्यांनीं एकमेकांना निरखून पाहिलें. दुसऱ्याच क्षणीं दोघांनीं एकमेकांना कडकडून मिठी मारली.

" अरे काळूराम, ठीक आहे ना ! "

" बुधा; लेका तूं सबंध उन्हाळाभर होतास तरी कुठं ? आणि माझा शोध तुला कसा लागला ? "

म्हातारीनें त्या दोघांना तसेच सोडून घरांत धूम ठोकली. तिच्या चेहऱ्यावर काळजीनें घर केलें होतें. आंत येतांच तिनें हातमागाजवळ फतकल मारली आणि जवळच बसलेल्या मांजराला तिनें विचारलें, " मी गोंधळांत पडलें आहे. काळूरामाच्या ह्या आवाज-प्रकरणाबद्दल तुझं काय मत आहे ? "

मांजर कांहींच बोललें नाहीं !

म्हातारीनें विनवणीच्या स्वरांत म्हटलें, " कृपा करून आतां मी काय करूं तें सांग. त्याला ठेवून घ्यायचं का ? तसं केलं तर झुडपांतून आणि छपरांतून येणाऱ्या आवाजांनीं आपण हैराण होऊं !"

तरीहि मांजर कांहींच बोललें नाहीं. आतां मात्र म्हातारीला राग आला. तिनें सूत भरण्याची कांडी मांजराच्या नाकावर फेंकून मारली आणि ओरडली, " तुझी जीभ कुठें गेली ? जेव्हां मला गरज असते तेव्हां तुझी दांतखीळ कां बसते ? "

इतक्यांत काळूराम आंत आला आणि म्हणाला, " बिचारा बुधा ! त्याचं जंगलांतील काम फारच मोठं आहे. "

" म्हणजे, तूं त्याच्याबरोबर जाणार आहेस काय ? " खरं म्हणजे म्हातारीच्या मनांत अजून ' ह्याला ठेवून घ्यावं कीं नाहीं ' याबद्दल कांहींच उलगडा झाला नव्हता.

" मला मोठा प्रश्न पडला आहे. मी जर त्याच्याबरोबर गेलों तर मला खूप सपाटून काम करावं लागेल. पण मग पैसाहि सपाटून मिळेल. जर मी इथं राहिलों तर थोडा आराम मिळेल. पण.... " असें म्हणून त्यानें आपले रिकामे खिसे उफराटे केले. त्या खिशांतून कांहींच निघालें नाहीं !

" बरं, पण तुझ्या आवाजाची काय भानगड आहे ? " म्हातारीनें न राहवून विचारलें.

" बुधानें तुला त्याविषयीं कांहीं तरी सांगितलें वाटतें ! " काळूराम म्हणाला.

म्हातारीनें नुसतीच मान हलविली.

" बुधा म्हणजे फारच गमत्या माणूस आहे बुवा ! " काळूराम म्हणाला.

" पण तें खरं आहे ना ? " म्हातारीनें नेट लावून विचारलेंच.

" तुला जर खरंखुरं जाणून घ्यायचं असलं तर मांजराला विचार. तें कांहीं खोटं सांगणार नाहीं. मांजरा, आवाजाचा असा कांहीं चमत्कार मी करतों का ? "

मांजर गुरगुरत म्हणालें, " मुळींच नाहीं. असलं मूर्खपणाचं कोण सांगतं आहे ? "

हें ऐकल्यावर म्हातारीचा जीव भांडयांत पडला. पण पुन्हां तिच्या लक्षांत आलें कीं, हा प्रकार एवढयावरच थांबलेला नाहीं.

तिनें काळूरामला विचारलें, " तूं त्या घोडेस्वाराबरोबर जाणार काय ? मी तुझी इथं कितीतरी सोय केली आहे. त्यांतच माझा सगळा पैशांचा साठा संपत आला आहे. आणि अजून नवीन सुगी लांब आहे."

मांजर लगेच म्हणालें, " म्हातारे, काळूरामाला नुसत्या जेवण-खाण्यावर तूं कसं थांबायला सांगतेस ? तूं जर त्याला यापुढें अधूनमधून कांहीं पैसे दिलेस तर तो खुषीनं इथंच राहील. "

" पण तसा पैसा देणं मला परवडत नाहीं. "


" नाहीं कसं, तुला नक्की परवडेल. तुझ्या पिशवींत अजून कांहीं नाणीं आहेत आणि पैशांविषयीं मीं सांगितलेलं तुला आठवतं का ? "

म्हातारीनें संमतिदर्शक मान डोलविली.

काळूराम म्हणाला, "मग मी सुखानं इथंच राहीन. आतां मी लाकडाची गाडी सोडतों आणि त्यांची नीट थप्पी लावतों." असें म्हणून तो अंगणांत गेला.

"आपण फारच चांगला निर्णय घेतला; होय ना मांजरा?" म्हातारीनें विचारलें. पण मांजरानें आपल्या मिशा फेंदारण्याखेरीज कांहींच हालचाल केली नाहीं.

काळूराम समोर नसतांना तें बिचारें कसें बोलणार?



◆◆◆

# चिमुकला सरदार

राजाची मिरवणूक दरबाराजवळ येऊन ठेपली. तुताऱ्या पुन्हां जोरांत फुंकल्या गेल्या. लोकांनीं मोठ्या आनंदानें राजाचा जयजयकार केला. राजा आणि राणी ह्यांनीं त्या जयजयकाराचा कौतुकानें स्वीकार केला. राजाच्या रथामागून दोन्ही राजकुमार शुभ्र घोड्यांवर बसून मिरवणुकी-बरोबर पुढें पुढें सरकत होते. त्या राजकुमारांच्या मागून कलाबतू माळलेला एक रथ येत होता. त्या रथाचें नक्षीकाम चांदीनें मढविलें होतें. रथाचे घोडेसुद्धां तालांत पाय टाकीत चालत होते. त्या नाजूक-साजूक रथांत राजकन्या बसली होती. राजकन्या रूपानें जशी सुंदर होती, तशी थोडीशी तिरसटहि असावी असें वाटत होतें. कारण, एवढ्या मोठ्या जल्लोषाच्या मिरवणुकींत तिचा चेहरा अगदीं मख्ख होता !

राजकन्येच्या दासीनें पाहिलें कीं, लोक आतां राजकन्येचा जयजय-कार करीत आहेत; तेव्हां ती राजकन्येला हलक्या आवाजांत म्हणाली, " आपण थोडं स्मितहास्य करावं. "

" मी मुळींच करणार नाहीं. " राजकन्या ओठांतल्या ओठांतच पुटपुटली. एवढेंच नव्हें तर तिनें दोन्ही बाजूंना उभ्या असलेल्या जनतेकडे नुसतें ढुंकूनहि पाहिलें नाहीं. शिवाय, तिची कुरकुर चालूच होती.... " मला ह्या सगळ्या रिवाजांचा भयंकर तिटकारा वाटतो. खरं सांगायचं म्हणजे मला असं रथांत बसून जायला सुद्धां नको वाटतं. मी मुलगी असलें म्हणून काय झालं ? माझ्या भावासारखं मला घोड्यांवर कां बसूं देत नाहींत ? आम्हां मुलींना मेली गंमत म्हणून कांहीं करूंच देत नाहींत ! नुसतं बसवून ठेवायचं ! राजपुत्रांइतकी मीहि घोड्यावर चांगली बसूं शकेन; नव्हे त्यांच्यापेक्षांहि उत्तम— "

नेमका ह्याच वेळीं राजाचा रथ दरवाजाशीं येऊन ठेपला. त्याबरोबर मागून येणारी मिरवणूक जेथल्या तेथें थांबली. त्यामुळें झालें असें कीं, राजकन्येचा रथ बागेच्या फाटकांतच अर्धा बाहेर आणि अर्धा आंत अशा स्थितींत उभा राहिला. तेव्हां आजूबाजूच्या लोकांचें कुजबुजणें राजकन्येच्या कानीं पडलें असावें. लोक म्हणत होते, " तिच्या सौंदर्यापेक्षां तिचा दिमाखच जास्त आहे. अशा गर्विष्ठेचं लग्न जमवतांना राजाला खूपच जड जाईल. हिच्याशीं लग्न लावणाऱ्या राजपुत्राची कींवच केली पाहिजे. "

ही कुजबुज दासीनें ऐकली असावी. म्हणून ती म्हणाली, "खरंच, आपण एकदां तरी हंसतमुख झाला म्हणजे— "

" माझं अडलंय् खेटर ! " असें म्हणत राजकन्येनें मानेला झटका दिला. इतक्यांत रथ हलला. त्यामुळें राजकन्येचा तोल जाऊन ती लोडावर आदळली. तिचीं कोपरें त्या लुसलुशीत लोडांत किती खोल रुतलीं ! आणि डोक्यावरचा मुकुटहि वांकडातिकडा झाला.

दासी म्हणाली, " आपण जर एखाद्या स्त्रीला शोभेलसं वागलांत तर— "

" उं ! मला काय करायचं तसं वागून ? मी मुळीं सरदार होणार आहे ! " असें म्हणून ती ताडकन् उठली आणि शेल्याचा घोळ स्वत:च आवरीत दाराजवळ थांबलेल्या रथांतून तिनें खालीं झोकांत उडी मारली. राजवाड्यांत जातां जातां ती गुणगुणली :

**" सरदार व्हायचं मला सरदार व्हायचं ।**
**बाई होऊन मला नाहीं विणीत बसायचं ।। "**

" चच्चच् " राजा, राणी आणि दासी एकदमच सर्व उद्गारले.

दोन्ही भाऊ तोंडावर हात ठेवून हंसूं दाबीत पुटपुटले, " पुन्हां झटका आलेला दिसतोय ! "

" आतां मात्र कांहींतरी केलं पाहिजे. " राजा म्हणाला, " हिचं लग्न करण्याची वेळ अगदीं उद्यांवरच येऊन ठेपल्यासारखं झालं आहे. एखादा पराक्रमी आणि करडा राजपुत्रच हिला सांभाळूं शकेल.



मला तर वाटतं कीं, आपण एक जाहीरनामा काढावा. आमच्या सुंदर (ती नक्कीच आहे!) आणि सुस्वभावी (तिनं मनांत आणलं तर ती फारच चांगलं वागते!) कन्येशीं लग्न करणाऱ्या राजपुत्राला राज्याचा तिसरा हिस्सा मिळेल!" आणि राणीकडे वळून राजानें विचारलें, "कशी काय कल्पना आहे?"

"मला ह्यांत कांहीं अर्थ वाटत नाहीं." हा किनरा आवाज होता राजकन्येचा.

सर्वांच्या नजरा राजकन्येकडे वळल्या. ती आपल्या शब्दांना जोर देण्यासाठीं जोरांत पाय आपटीत येत होती. "माझ्याजोगा शूर राजपुत्र कुठंच नाहीं. मग मी वाटेल त्याच्याशीं कशाला करूं लग्न?"

"तो कुणीतरी मुळींच असणार नाहीं." राजा म्हणाला, "दोन अटी पुऱ्या करणारा राजपुत्रच निवडला जाईल."

"कोणत्या त्या अटी?" राजकन्येनें निर्विकारपणें विचारलें, "म्हणजे मीच त्या पुऱ्या करून टाकतें!"

"पहिली अट म्हणजे पूर्वेच्या जंगलांतील त्या पिसाळलेल्या हत्तीचे दांत आणणें." राजा म्हणाला.

" हत्ती ? हात्तिच्या ! " राजकन्या पुटपुटली.

" आणि दुसरी म्हणजे पश्चिमेकडच्या जंगलांतील राक्षसाला देशा-बाहेर हुसकणें किंवा ठार मारणें. " राजा म्हणाला.

" कदाचित् तेथें राक्षस नसेल सुद्धां." राजकन्या म्हणाली, " कितीतरी वर्षांत त्याच्याविषयीं कुणींच कांहीं ऐकलं नाहीं."

" अशा परिस्थितींत राजपुत्राला अगोदर सिद्ध करावं लागेल कीं, राक्षस त्या तिथेंच आहे किंवा नाहीं." राजा उत्तरला.

" म्हणजे नुसतं भटकून यायचं एवढंच....उं ! " राजकन्या म्हणाली.

लवकरच राज्यांत जिकडे तिकडे राजाचा जाहीरनामा फडकला.

• • •

त्या राज्यांतच एक मोठा श्रीमंत माणूस राहत होता. त्याचा पंचकल्याणा घोड्यांचा मोठा तबेला होता. त्या तबेल्यांत फुलसुंदर नांवाचा एक नवीनच कुमार कामाला होता. त्याला तेथें येऊन जवळ जवळ एक वर्ष झालें होतें. परंतु तो तेथें कोठून आणि कां आला हें कोणालाहि माहीत नव्हतें. आणि फुलसुंदरनेंहि आपण कोठून व कशाकरितां आलों हें सांगितलें नव्हतें. आतां हें बरिक खरें कीं, तो एका राजाचा मुलगा होता. असें म्हणतात कीं, फुलसुंदरला धाडसाचीं कामें करण्याची मुळींच आवड नसल्यानें वडील त्याच्यावर रागावले होते ! पण खरें कारण निराळेंच होतें. राजा म्हणायचा कीं, राजपुत्रानें पराक्रम करून दाखविला नाहीं तर त्याचें लग्न राजकन्येशीं कसें होणार ?

फुलसुंदर मात्र बेफिकीरपणें म्हणावयाचा,

" इथं कुणा लेकाला राजकन्येशीं लग्न करायचं आहे ? राजकन्या म्हणजे नंबर एकच्या आळशी ! गादीवर बसून लोकर विणीत स्वतःला जिंकण्याकरितां कांहीं तरी मोठं करून दाखविणाऱ्याची वाट पाहत बसतात त्या ! लग्नच करायचं असेल तर एखाद्या स्वाभिमानी मुलीशीं करीन. एखाद्या बुळ्या राजकन्येशीं लग्न करण्याऐवजीं घोड्याचा खरारा करणं काय वाईट ? "

" जा मग. हो चालता. आणि कर घोड्यांना खरारा ! " राजा ओरडला होता, " आणि तुझ्यांत बदल झाल्याशिवाय पुन्हां परतूं नकोस."

त्याप्रमाणें फुलसुंदर एके दिवशीं ह्या तबेल्यांत येऊन दाखल झाला. लवकरच तो त्या तबेल्यांतील घोडयांची काळजी घेण्यांत रमून गेला.

फुलसुंदरच्याहि वाचनांत इथल्या राजाचा जाहीरनामा आला. जाहीरनामा वाचून झाल्यावर तो स्वत:शींच हंसला. "ह्याहि राज्यांत वाट पाहणारी राजकन्या आहे म्हणावयाची ! मला तिच्याशीं कांहींच कर्तव्य नाहीं म्हणा. पण काय काय होतंय् तें पाहणं मोठं गंमतीशीर होईल. मला वाटतं, जेव्हां राजपुत्र त्या हत्तीच्या स्वारीवर निघतील तेव्हां त्या पूर्वेच्या जंगलांत जावं आणि काय होतं तें पाहावं."

इकडे काय झालें ? 'सुंदर आणि सुस्वभावी' राजकन्या मिळावी म्हणून दोन तरुण सरदार राजापुढें हजर झाले. एकानें काळ्या रंगाचा पोशाख चढवला होता. त्याचा घोडाहि काळ्या रंगाचाच होता. दुसऱ्या सरदारानें निळा पोशाख आणि निळा घोडा घेतला होता. राजापुढें त्यांचीं बोलणीं चालू असतांना राजकन्याहि त्यांच्याकडे टक लावून पाहत होती. पाहतां पाहतां तिच्या तोंडावर हंसू चमकलें. कारण, त्या वेळीं तिच्या मनांत एक गंमतशीर विचार आला होता. तिनें मनांतल्या मनांत स्वत:करितां

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों दि.



सरदाराच्या पोषाखाची जुळवाजवळ केली. खरें म्हणजे तें कांहीं तितकेंसें सोपें नव्हतें. कारण तिची अंगकाठी फारच नाजूक होती. तरी पण तिनें आपल्या भावांचा लहानपणचा जुना पोषाख शोधून काढला. नंतर शिरस्त्राणहि पैदा केलें. शस्त्रागारांतून कोणाच्या लक्षांत न येणारी जुनी-पुराणी ढाल व तलवार हस्तगत केली. नंतर तिनें ढाल घासूनपुसून घेतली. तलवारीला धार लावली. हो! तिच्या सरदारकीच्या ऐटीला शोभतील अशीं शस्त्रेंसुद्धां हवींच. पण हें सगळें कसें अगदीं गुपचूप!

"त्या दोघांच्या अगोदर जाऊन मीच त्या अटींचा फडशा पाडतें. म्हणजे मग लग्नाची भुणभुणच राहणार नाहीं. मुलीसुद्धां हें धाडस करूं शकतात हें मी सिद्ध करूनच दाखवीन.

**सरदार व्हायचं मला सरदार व्हायचं।**
**बाई होऊन मला नाहीं त्रिणीत बसायचं॥"**

पहिली अट पुरी करण्याकरितां एक दिवस ठरविला गेला. पूर्वेकडच्या जंगलांतील माजलेल्या हत्तीचे दांत आणायचे. ते दोन्ही तरुण सरदार अखेरच्या सूचना घेण्याकरितां राजवाड्यावर आले. त्या वेळीं तुताऱ्या फुंकल्या गेल्या. ढोल वाजवले गेले. लोकांनीं त्या दोघांना पाहण्यासाठीं खूप गर्दी केली. एकच जल्लोष उडाला. सगळ्यांची उत्सुकता शिगेला पोंचली. सगळ्यांचें लक्ष त्या तरुण सरदारावर खिळलें. त्या गर्दींत राजकन्या कुठें आहे, याचें कुणालाच भान राहिलें नाहीं.

जर कुणी त्या गर्दींतूनहि बाहेर पडून लक्ष दिलें असतें, तर त्याला पूर्वेच्या जंगलाकडे लगबगीनें जाणारा एक चिमुकला घोडेस्वार दिसला असता. त्या चिमुकल्या सरदाराची घोड्यावरची बैठक सारखी ढासळत होती. त्याचें शिरस्त्राण पुनः पुन्हां डोळ्यांवर घसरत होतें. त्यामुळें लगाम धरलेल्या उजव्या हातानें त्याला तें शिरस्त्राण वरचेवर सांवरावें लागत होतें. ढाल धरून त्याच्या डाव्या हाताला चांगलीच रग लागलेली दिसत होती. तशाहि अवस्थेंत तो जोरांत घोडदौड करीत जंगलांतून चालला होता. इतक्यांत तो एकदम थांबला.

कुणीतरी ह्या चिमुकल्या सरदाराच्या हालचाली निरखून पाहत होतें. तो होता फुलसुंदर!



जेव्हां चिमुकल्या सरदाराचा घोडा पूर्ण थांबला तेव्हां फुलसुंदर आपला घोडा त्याच्याजवळ नेत म्हणाला, " आपल्याला कांहीं त्रास होतोय का ? "

" छे ! मुळींच नाहीं ! " ह्या आगंतुक चौकशीनें चिमुकल्या सरदाराचा आवाज चांगलाच चढला होता. पण त्यांतहि निश्चयाची झळाळी होती.

" अस्सं ! मला वाटलं.... " असें म्हणून फुलसुंदरनें आपला घोडा वळविला. तो आतां टांच मारणार इतक्यांत चिमुकल्या सरदारानें विचारलें, " अहो, तुम्ही—म्हणजे तुमचं— "

" माझं नांव फुलसुंदर. आपण कोण आहांत ? "

" मी—माझं नांव धैर्यशील. मी सरदार आहें. मी ह्या जंगलांतील उन्मत्त हत्तीच्या शोधांत आहें "

" तुला राजकन्या जिंकायची आहे वाटतं ? "

" नाहीं, नाहीं. मला फक्त इतरांची गंमत करायची आहे. म्हणून पहिल्या प्रथम मीच त्या हत्तीचे दांत मिळवणार आहें. "

हें ऐकून फुलसुंदरला मनांतल्या मनांत हसूं आलें. मग तो म्हणाला, "मीं तुला मदत केलेली आवडेल काय? म्हणजे त्याचं असं आहे कीं, तूं थोडा लहानखुराच आहेस. मला असं म्हणायचं आहे कीं, तूं कांहीं खऱ्याखुऱ्या सरदाराइतका मोठा नाहींस."

"माझं काम पार पाडायला माझा मी समर्थ आहें." चिमुकल्या धैर्यशीलनें ठणकावलें.

फुलसुंदर म्हणाला, "तूं तें काम करूं शकशील ह्याची मला खात्री आहे. पण—अर्थात् तुला माहींतच आहे कीं, जर त्या उन्मत्त हत्तीचे दांत तोडायचे असतील तर तूं एका झाडाच्या खोडाला टेकून उभं राहिलं पाहिजेस; आणि तो हत्ती रोख धरून मुसंडी मारीत तुझ्या जवळ आला, आणि अगदीं जवळ आला म्हणजे शेवटच्या क्षणीं तूं चटकन् बाजूला व्हायचंस. म्हणजे हत्तीचे दांत झाडाच्या खोडांत रुतून बसतील. नंतर तूं ते तोडून घेशीलच."

"तुझ्या ह्या सूचनेबद्दल मी ऋणी आहें." धैर्यशील ताठरपणें म्हणाला. "मला खात्री आहे कीं, मी सगळं व्यवस्थित पार पाडीन. तूं मात्र मागं उभं राहावंस हें चांगलं. म्हणजे तुला कांहीं इजाबिजा होणार नाहीं, हां! दुसरं असं कीं, जर तुला ते काळे-निळे सरदार येतांना दिसले तर मात्र मला सूचना कर."

मग चिमुकला सरदार जंगलांतील घनदाट भागांत शिरला. पुढें सरकतांना त्याची नजर सारखी डावीकडून उजवीकडे आणि उजवीकडून डावीकडे फिरत होती, हत्तीचा शोध घेत होती. फुलसुंदरहि त्याच्या मागोमाग निघाला. त्याला वाटलें कीं, न जाणों, ह्या विलक्षण वाटणारा चिमुकला सरदार एखाद्या भयंकर संकटांत सांपडायचा!

शेवटीं एकापाठोपाठ ते दोघेहि जंगलांतील एका मोकळ्या ठिकाणीं येऊन पोंचले. तेथें त्यांना त्या माजलेल्या हत्तीचे चित्कार ऐकूं येऊं लागले.

फुलसुंदर पुढें होऊन म्हणाला, "हें बघ, मी तुझा घोडा बाजूला लपवून ठेवतों. तूं मात्र हत्तीचं लक्ष स्वत:कडं वेधून घे; आणि तो हत्ती तुझ्या रोखानं येऊं लागला म्हणजे एखाद्या भक्कम झाडाला टेकून उभा राहा."

चिमुकला सरदार घोड्यावरून खालीं उतरला. डाव्या हातांतली ढाल आपल्यापुढें धरीत, उजव्या हातांतील तलवार हवेंत गरगर फिरवीत आणि आरोळ्या ठोकीत तो झाडाजवळ जाऊन उभा राहिला. त्या आरोळ्यांनीं हत्तीचें लक्ष वेधलें गेलें आणि तो जोरानें चीत्कार करीत चिमुकल्या सरदाराच्या रोखानें धांवत आला. तो इतका जवळ आला कीं, आतां त्याचे दांत चिमुकल्या सरदाराच्या पोटांत घुसणार; इतक्यांत चिमुकला सरदार टुणकन् उडी मारून बाजूला झाला. त्यामुळें हत्तीचे दोन्ही दांत झाडाच्या खोडांत 'कड्कड् कडाड्कड्' असा आवाज करीत खूप खोल रुतले. हत्तीनें खूप अकांडतांडव केलें, पाय झाडले. पण खोडांतून त्याचे दांत कांहीं निघेनात.

फुलसुंदरनें हळूंच सूचना केली, "बघतोस काय, त्याचे दांत तोड. म्हणजे तो हत्ती जंगलांत धूम ठोकीत निघून जाईल."



अनुक्रम ३८८४७
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ३९३८

पण चिमुकल्या सरदाराला तसें करण्याचें कांहीं धैर्य होईना. खरें सांगायचें म्हणजे तो कांहीं पुरेसा धट्टाकट्टा नव्हता.

मग फुलसुंदर पुढें झाला. त्यानें चिमुकल्या सरदाराच्या हातांतली तलवार काढून घेतली आणि एका घावांत हत्तीचे दांत तोडले.

जखमेच्या भयंकर वेदनांनीं विव्हळत आणि चित्कार करीत हत्तीनें जंगलांत धूम ठोकली. फुलसुंदरनें वळून पाहिलें तेव्हां चिमुकला सरदार डोळ्यांवर हात ठेवून म्हणत होता, " अरेरे ! तूं त्याला जखमी केलंस !"

" जखमी केलं? मला वाटलं तुला त्याचे दांत हवे आहेत म्हणून—"

" हो, मला हवेच होते. असो. " नंतर तो म्हणाला, " ते कोण येताहेत ? "

त्यांनीं कान देऊन ऐकलें तेव्हां त्यांना घोडयांच्या टापांचा जवळ जवळ येणारा आवाज ऐकूं आला.

" चल, आटप. आपल्याला लपून बसलं पाहिजे. " चिमुकला सरदार म्हणाला. लगेच आपापले घोडे घेऊन ते दोघे एका दाट जाळींत लपले. त्या गडबडींत फुलसुंदरनें तोडलेले हत्तीचे दांत तेथेंच पडून राहिले.

काळ्या पोषाखांतला आणि काळ्या घोड्यावरचा सरदार नेमका त्याच झाडाजवळ येऊन थांबला. त्याला जेव्हां हत्तीचे तुटलेले दांत दिसले तेव्हां त्यानें आजूबाजूला टेहळणी केली. पण तेथें कुणीच नव्हतें. मग तो मोठयानें उद्गारला, " काय विलक्षण नशीब आहे पहा ! " त्यानें ते दांत पटकन् उचलून घेतले आणि जंगलाबाहेर घोडा दामटीत तो आपल्या सोबत्याला हांक मारून आनंदानें म्हणूं लागला, " मीं पहिला पण जिंकला आहे. मी माजलेल्या हत्तीचे दांत मिळवले आहेत. काय जंगी हल्ला केला मीं ! "

तें ऐकून चिमुकला सरदार फुलसुंदरकडे वळून कुरकुरला, "तें कृत्य त्यानं केलं नसून मीं केलं—म्हणजे मला असं म्हणायचं आहे कीं, आपण दोघांनीं केलं. मी त्याला धडा शिकवतों पहा." असें म्हणून तो घोडया-कडे धांवत गेला. घोडयावर बसून त्याचा पाठलाग करावा म्हणून त्यानें

उंच उडी मारली. पण ती नुसतीच जमिनीवरची उडी ठरली! कारण अंगावरच्या जड चिलखतासहित त्याला पुरेशी उंच उडी मारतां येईना. म्हणून फुलसुंदरनें आपला हात पुढें केला. त्यावर सरदारानें पाय ठेवून चढावें म्हणून सूचना केली. चिमुकला सरदार तसें करीत असतांना फुलसुंदरचें लक्ष त्याच्या पायाकडे गेलें. किती छोटा आणि नाजूक पाय होता तो!....

पण फुलसुंदरनें कांहीं म्हणण्यापूर्वींच चिमुकला सरदार रागाच्या झपाट्यांत खूप लांब गेला होता. त्याचें शिरस्त्राण पुन्हां डोळ्यांवर घसरूं लागलें होतें. मग फुलसुंदरहि आपल्या श्रीमंत मालकाकडे निघाला. त्याला संध्याकाळचें खराऱ्याचें काम करायचें होतें!

पण कुणी जर पाळतच ठेवली असती तर त्याला दिसलें असतें कीं, कांहीं मैल गेल्यानंतर चिमुकला सरदार शेतांतल्या उभ्या पिकांत दिसेनासा झाला आणि नंतर त्या पिकांतून घोड्यावर नेहमींच्या पोशाखांत बसलेली राजकन्या बाहेर पडली! पण कुणींच पाळत ठेवली नव्हती. फुलसुंदर तर केव्हांच तबेल्यांत पोंचला होता.

त्या दिवशीं संध्याकाळीं राजधानींत सगळीकडे एकच चर्चा. काळ्या सरदारनें तर बढाई मारण्याचा सपाटाच चालविला होता. आणि निळा सरदारहि आपणच दुसरा पण जिंकणार म्हणून जाहिरात करीत होता.

राजकन्या मात्र सौधावर बसून त्यांच्या ह्या हालचाली नुसतीच पाहत होती. कारण तिनें जर स्वत: केलेल्या पराक्रमाची खरी हकीकत सांगितली असती तर कुणींच त्यावर विश्वास ठेवला नसता. मग तिनें तेथल्या तेथेंच निश्चय केला कीं, पश्चिमेच्या जंगलांतील राक्षसाला अशा रीतीनें हद्दपार करायचें कीं, सगळ्यांची आपल्या धाडशीपणाबद्दल खात्री पटली पाहिजे.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुन्हा एकदां राजवाड्यासमोर नगरवासी जमले. त्या दोन्ही तरुण सरदारांनीं राजाला मोठ्या ऐटींत मुजरे करून जंगलाच्या रोखानें कूच केलें. काळ्या सरदारानें तर आपल्या कमरेभोंवतीं हत्तीचे शुभ्र पिवळसर दांत मुद्दामच बांधले होते. नाहींतर त्यानेंच पहिला पण जिंकला होता हें लोकांना कळणार कसें?

थोड्या वेळानें शेतांतील पिकांतून चिमुकला सरदार धैर्यशील हाहि घोड्यावरील आपली डळमळती बैठक सावरीत बाहेर पडला. कालच्याप्रमाणें आजहि घोड्यावर बसून फुलसुंदर जंगलाच्या तोंडाशीं वाट पाहत होता. चिमुकला सरदार जवळ आल्यावर त्यानें विचारलें;

" तूं राजवाड्यांत जाऊन राजाला कालच्या प्रसंगाबद्दल सांगितलंस कीं नाहीं ? "

" अरे वा ! तूं आलास का ! पण मी कांहीं राजवाड्यांत गेलों नाहीं. आणि गेलों असतों तरी माझ्यावर कोण विश्वास ठेवणार ? आज मात्र आपण त्या राक्षसाला पिटाळून लावूं या–म्हणजे मला असं म्हणायचं आहे कीं, 'मी' नक्कीच त्या राक्षसाला पिटाळून लावणार ! म्हणजे मग सर्वांचे डोळे उघडतील. " सरदार धैर्यशील म्हणाला.

ते दोघेहि बरोबरच जंगलांत निघाले. चालतां चालतां मध्येंच भुवयांपर्यंत येणारें शिरस्त्राण मागें सरकावीत चिमुकला सरदार म्हणाला, " नाहीं, म्हणजे त्याचं असं आहे कीं, राक्षसाला कसं हुसकावयाचं तें मला पुरतं ठाऊक आहे. पण तुझी कांहीं कल्पना आहे काय ? "

" हो ! जर आपल्या दृष्टीस तो पडला—नव्हे तुझ्या दृष्टीस तो पडला तर तो तुझा पाठलाग करील, असं कांहींतरी कर. तो पाठलाग करूं लागला म्हणजे त्याला असा कांहीं फिरव कीं, तो नेमका आपल्या फाशांत अडकून पडला पाहिजे. मग जंगल सोडून जाण्याचें त्यानें वचन देईपर्यंत त्याची त्या फांशांतून सुटकाच करायची नाहीं. "


" बरसं, असंच ! पण कोणत्या प्रकारचा फांसा लावणार तूं ? " डाव्या हातांतील ढाल घट्ट पकडीत सरदार धैर्यशीलनें विचारलें.

मग फुलसुंदरनें सगळा बेत नीट समजावून सांगितला. कांटेरी फांद्या आणून त्यांचें जाळें कसें करायचें, दोराचा फांस रस्त्यांत कसा लपवून ठेवायचा, राक्षसाला हुकवीत हुकवीत नेमका त्या ठिकाणीं कसा आणायचा इत्यादि बारीकसारीक गोष्टी सांगून झाल्यावर फुलसुंदर म्हणाला, " खरं म्हणजे तुझ्या मनांत असाच कांहीं तरी बेत होता, होय ना ? "

चिमुकला सरदार म्हणाला, "अगदीं हीच युक्ति माझ्या मनांत आली होती; नेमकी हीच !" असें म्हणतांना त्यानें होकारार्थी म्हणून मान खूप जोरानें हालविल्यामुळें डोक्यावरचें लोखंडी घमेलें चांगलें नाकापर्यंत घसरलें ! धैर्यशीलनें तें पुन्हां वर सरकवीत म्हटलें, "चल तर मग, लागूं या तयारीला."

त्या दोघांनीं जंगलांतील एक दाट झाडांची जागा निवडली. त्या जागेकडे जाणारा रस्ता इतका अरुंद होता कीं, जातांना दोन्हीं बाजूंच्या झाडांच्या खडबडीत खोडांना अंग चांगलेंच घांसलें जाई. कपाळाला फटकन फांदी लागून टेंगूळ उभे राही. पायांत वेलीचा गुंता अडकून माणूस धप्पदिशी तोंडावर पडायचा देखील.

अशा परिस्थितींत चिमुकल्या सरदारानें राक्षसाला डिवचून डिवचून पाठलाग करायला भाग पाडलें. राक्षसहि चिडला. तो वेड्यासारखा चिमुकल्या सरदाराच्या आवाजाच्या रोखानें धांवत सुटला. तो जवळ जवळ येऊं लागला. तेव्हां त्या राक्षसाच्या किंकाळ्या चिमुकल्या सरदाराच्या त्या मोकळ्याढाकळ्या शिरस्त्राणांत शिरून प्रतिध्वनि करूं लागल्या. डोक्यावरच्या घमेल्यांतील आवाज जेव्हां ढगांच्या गडगडाटासारखा होऊं लागला तेव्हां



चिमुकल्या सरदारानें ताडलें कीं, राक्षस आतां अगदीं हाताच्या अंतर आलेला दिसतो. मग तो एका जाळींत लपून बसला. इतक्यांत अक्र विक्राळ आवाज करीत राक्षस आला आणि फांशांत पाय अडकून कांटेरी फांद्यांत जाऊन कोलमडला.

त्या कांट्यांनीं राक्षसाला इतकें बेजार केलें कीं, विनवण्या करूं लागला. राक्षस खरोखरच नरम पडलेला पाहून पुढें झाला आणि म्हणाला, " जर तूं हा देश सोडून जाशील तर तुझी सुटका करूं. "

राक्षसानें तें कबूल केलें. फुलसुंदरनें त्याच्या पाय फां काढला. कांटेरी फांद्या दूर केल्या. राक्षसानेंहि मग मुकाट्यानें ती केसांची एक बट काढून त्यांच्या हातीं देऊन पलायन केलें.

राक्षस दूर गेला अशी खात्री झाली तेव्हां कुठें झाडाच दडी देऊन बसलेला चिमुकला सरदार धैर्यशील हातांतील पकडींत बाहेर आला.

हा सगळा प्रकार पाहून जंगलांत आलेल्या त्या दो केव्हांच घर गांठलें होतें ! काळ्या सरदारानें तर घाबरून हत्त तेथेंच टाकून दिले होते.

झालेल्या प्रकारानें आपले सरदारबुवा—नव्हे सरदार ढवळून निघाल्या ! राजकन्येनें मग फारसा हेका न धरतां पट सुंदरला प्रणाम केला. प्रणाम करतांना डोक्यावरचें तें लोखं जमिनीवर पडलें आणि राजकन्येची लांबलचक काळीभोर वेणी ओघळून फुलसुंदरच्या पायावर पडली.

फुलसुंदर आश्चर्यचकित होऊन म्हणाला, " म्हणजे, प्रकार आहे ? "

राजकन्येनें सर्व वस्तुस्थिति समजावून सांगितली. शेवटीं ती " मला अजूनहि नुसतंच विणीत बसणाऱ्या बाईचा तिटकारा माझी अशी इच्छा आहे कीं, फुलसुंदरबरोबर—"

" वा ! वा ! कां नाहीं ? जरूर मी तुझ्याशीं लग्न करीन. "
रनें असें म्हटल्यावर राजकन्येचा चेहरा केवढा हंसरा झाला !

मग त्यांनीं ' पण ' जिंकल्याच्या खुणा म्हणून तेथें पडलेले हत्तीचे राक्षसांच्या केसांची बट घेऊन राजवाड्याकडे कूच केलें.

राजवाड्यावर पोंचल्यावर त्या दोघांना पाहून दोन्ही राजे चकित फुलसुंदरचे वडीलहि त्याचा तपास करण्यासाठीं तेथें आले होते. ) एकदम म्हणाले,

जकन्येमध्यें झालेल्या ह्या बदलामुळें मला फार समाधान वाटतें."

फुलसुंदरचें मन पालटलें म्हणून मला फार आनंद होत आहे."

◆◆◆

अनुक्रम ३७७४७
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ३७३८
नों. दि. १८।४।६७

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. ................ नों. दि ..............
वि. ................ क्र. ..........

IRBK-0109138
IRBK-0109138